महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, नाशिक विभाग, नाशिक
एन. डी. पटेल रोड, एस. टी. वर्कशॉप जवळ, नाशिक - ४२२००१
Tel - ०२५३-२४५३५५४, २५०४९८४
E-mail : ddgsdanashik@gmail.com dydirnashik@yahoo.co.in

जा.क्र.उपसं/भूसविय/ना/तंत्र/ 92 /२०२६ दिनांक :- 09 JAN 2026

प्रति,
निविदाकार
--------------------------------
--------------------------------
--------------------------------

**विषय :** या कार्यालयाकडील संगणक कक्ष/भांडारात असलेले निरूपयोगी/कालबाहय निर्लेखित साहित्य विक्री करीताचे दर पत्रक मागणी बाबत.

संदर्भ : १) महाराष्ट्र शासन वित्त विभाग, परिपत्रक क्र.डिएफपी-१०९१/प्र.४/विनीमय मंत्रालय, मुंबई दि. १८/०६/१९९१
२) महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग,शासन निर्णय क्र.शाआशा/-२०१८/प्र.क्र.४८६/ का-१३ मंत्रालय, मुंबई दि. ०७/१२/२०१८
३) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.डिएफपी-१०१६/प्र.क्र.०७/१६/विनीयम मंत्रालय, मुंबई दि.२२ जून २०१६

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून कळविणेत येते, प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, नाशिक विभाग, नाशिक कार्यालयाचे संगणक कक्ष/भांडारातील असलेले निरूपयोगी/कालबाहय निर्लेखित Air Conditioner, Filling Cabinate इ. साहित्य खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून विक्री करावयाची प्रक्रीया प्रगतीत आहे.

तरी खालील नमूद करण्यात आलेल्या साहित्याचे दर सर्व करासहीत मोहोरबंद पाकीटात उपसंचालक कार्यालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, 1 ला मजला, एन.डी.पटेल रोड, गडकरी चौक, नाशिक 422001 या ठिकाणी दिनांक 29/01/2026 पर्यंत सायंकाळी 5.00 वाजे पर्यंत मिळतील अशा पध्दतीने पाठवावे.

| अ.क्र. | कार्यालयाकडील निरूपयोगी / कालबाहय निर्लेखित साहित्याचा तपशिल | संख्या (नग) | साहित्याचे मटेरील | कार्यालयीन निर्धारीत विक्री मुल्य (रू.) | दर (रु.) | रक्कम अक्षरी रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Voltas Make Air Conditioner (Window Type) | 03 | Air Conditioner | ७०४४/- | | |
| २ | Filling Cabinate | 01 | लोखंडी | १८०/- | | |

**कार्यालयाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे –**

1. अटी व शर्तीयुक्त दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.
2. दरपत्रकामध्ये नमूद किंमती हया नाशिक शहराकरिता सर्व टॅक्स सह नमूद असावी.



Scanned with CamScanner

3. उपरोक्त प्रमाणे साहीत्य हे कार्यालयीन वेळेत सकाळी 10 ते सायं 5.30 वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांमध्ये दि.20/01/2026 ते 28/01/2026 पर्यंत पहाणी करिता उपलब्ध राहील.
4. निर्धारीत मुल्यापेक्षा जास्त विक्री मुल्य असलेल्या दरपत्रकांपैकी निवड करण्यात आलेल्या उच्चतम दरपत्रक धारकास साहीत्य विक्री आदेशाच्या दिनांकापासून पुढील 3 कार्यालयीन दिवसांचे आंत साहित्याची रक्कम या कार्यालयातील लेखा शाखेत भरणा करावी लागेल.
5. साहीत्याची रक्कम लेखा शाखेत भरणा केलेपासून कार्यालयीन सुचनेनुसार पुढील 3 कार्यालयीन दिवसाचे आत साहित्य या कार्यालयातून आहे त्या स्थितीत स्वत:चे जबाबदारीवर घेऊन जावे लागेल.
6. साहित्य घेऊन जाणेकरिता वाहतूक खर्च देय राहणर नाही व साहित्य घेऊन जातांना कार्यालयाचे कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास सर्वस्वी जबाबदारी निवड करण्यात आलेल्या दरपत्रक धारकाची राहील.
7. कोणतेही दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणे याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवलेला आहे.
8. दरपत्रकासोबत उच्चतम दरपत्रक धारकाने शॉप ॲक्ट नुसार प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
9. ज्या उच्चतम दरपत्रक धारकाची निविदा मंजूर करण्यात येईल त्या धारकास कोणताही हमाल, वाहतूक किंवा सामान हाताळणीचा खर्च तसेच मनपा वाहतूक कर या कार्यालयाकडून देय होणर नाही.
10. निकाली सामान कार्यालयातून बाहेर नेतांना कार्यालयीन वस्तूंची मोडतोड झाल्यास त्याची नुकसान भरपाई रोखीच्या स्वरुपात निवड करण्यात आलेल्या उच्चतम दरपत्रक धारकाकडून घेण्यात येईल.

(डॉ. विजयता सोलंकी )
प्रादेशिक उपसंचालक
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा
नाशिक विभाग, नाशिक

प्रत- १) कार्यालयातील आस्थापना/लेखा शाखेस माहितीस्तीसाठी.
२) महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर
३) नोटीस बोर्ड



Scanned with CamScanner